आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. राज्य विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी; उमेदवारी अर्ज भरायला आजपासून प्रारंभ.
2. राष्ट्रीय जल पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण.
3. दिवाळी फराळाचे पदार्थ परदेशात पाठविण्यासाठी नागपूर टपाल कार्यालय सज्ज; दिवाळी पर्यंत फ्री पिकअपची सेवाही उपलब्ध.
4. पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या पुढाकारातून साजरी होणार 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी'.

<u>अधिसूचना/अर्ज</u>

महाराष्ट्रात एकाच टप्प्यात होत असलेल्या, विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना, आज प्रसिद्ध झाली असून, राज्यातल्या सर्व २८८ मतदारसंघांमध्ये, एकाच टप्प्यात, येत्या वीस नोव्हेंबरला, मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज, आजपासून भरता येतील. २९ ऑक्टोबरपर्यंत, उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी, तीस ऑक्टोबरला होईल आणि चार नोव्हेंबरपर्यंत, उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. वीस नोव्हेंबरला, मतदान आणि, तेवीस नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या, पोटनिवडणुकीची अधिसूचनाही, जारी झाली आहे. काँग्रेस खासदार, वसंत चव्हाण यांच्या निधनामुळ, ही जागा रिक्त झाली आहे. पोट निवडणुकीसाठीचं मतदानही, वीस नोव्हेंबरला होणार असून, मतमोजणी, २३ नोव्हेंबरला होईल. दरम्यान, नागपूर विधानसभा मतदारसंघात, अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला, आजपासून सुरुवात झाली आहे. यासाठी निवडणूक यंत्रणा, सज्ज झाली असल्याची माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी, विपिन इटनकर यांनी दिली आहे. त्याचबरोबर भरारी पथक सुद्धा, तयार करण्यात आले आहे. आचार संहिता भंग होऊ नये यासाठी देखील, उपाययोजना करण्यात आल्या आहेत. अकोला जिल्ह्यात, विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं, जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघात आज, एकही नामनिर्देशन दाखल झालं नाही. दरम्यान, आज दुपारी तीन वाजेपर्यंत, एकूण, १५४ अर्जांची उचल झाली आहे तर, चंद्रपूर

जिल्ह्यातील सहा विधानसभा इच्छुकांकडून, २१६ अर्जांची उचल करण्यात आली. गडचिरोली जिल्ह्यात अहेरी मतदार संघात आज अपक्ष उमेदवार दीपक आत्राम यांनी अर्ज दाखल केल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीने दिली आहे.

<u>सक्षम मोबाईल **ॲ**प</u>

आगामी विधानसभा निवडणुकीत, दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांना, सुलभरीतीनं मतदान करण्यास, मदत व्हावी यासाठी, निवडणूक आयोगानं, सक्षम नावाचं मोबाईल **ॲ**प, तयार केलं आहे. या सुविधेचा, सर्व दिव्यांग मतदारांनी, लाभ घ्यावा असं आवाहन, करण्यात आलं आहे. या **ॲ**पद्वारे, मतदार संघातील, दिव्यांग वयोवृद्ध मतदानाचे, मतदार संघ आणि स्थान निश्चिती करणे शक्य होईल. **ॲ**पद्वारे नोंदणी झाल्यानंतर, ने-आण करण्यासाठी, वाहतूक व्यवस्था, व्हील चेअर, सहाय्यक मदतनीस, इत्यादी प्रकारची सुविधा, दिव्यांग मतदारांना, उपलब्ध करून दिली जाईल.

<u>देवळीत मतदान केंद्रांत वाढ</u>

देवळी-पुलगाव विधानसभा मतदार संघात, ३३१ मतदान केंद्र होते. ज्या मतदान केंद्रामध्ये, 1,300 पेक्षा अधिक मतदार संख्या आहे अशा, मतदान केंद्राची विभागणी करुन, त्या ठिकाणी दोन मतदान केंद्र, तयार करण्याच्या निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार, देवळी विधानसभा मतदार संघात, चार मतदान केंद्राची वाढ करुन, ३३५ मतदान केंद्र तयार करण्यात आली आहे. यात मतदान केंद्र क्रमांक, ७० आणि ७२, गुंजखेडा ज्ञानभारती विद्यालय, देवळीचा मतदान केंद्र क्रमांक, १८४, यशवंत कन्या शाळा आणि, मतदान केंद्र क्रमांक, १८८, जनता प्राथमिक शाळा इथं ही वाढीव मतदान केन्द्र असणार आहेत.

<u>जल पुरस्कार</u>

सरकारनं सुरू केलेल्या जलजीवन मिशनमुळ, ग्रामीण भागात राहणाऱ्यांच्या जीवनात, लक्षणीय सुधारणा झाल्याची माहिती, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज, दिली. जलशक्ती मंत्रालयातर्फे दिल्या जाणाऱ्या, पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण, आज नवी दिल्ली इथं, राष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी त्या बोलत होत्या. या पुरस्कारांसाठी, सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, शाळा किंवा महाविद्यालय, उद्योग, सर्वोत्कृष्ट पाणी वापरकर्ती संघटना, संस्था आणि नागरी संस्था अशा, नऊ श्रेणींमध्ये, ३८ विजेते निवडण्यात आले. सर्वोत्कृष्ट राज्याच्या गटात, ओडिशानं पहिला,

उत्तर प्रदेशनं दुसरा तर, गुजरात आणि पुद्दुचेरीनं, संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकावला. महाराष्ट्रालाही पाच जलपुरस्कार मिळाले आहेत. यात सर्वोत्कृष्ट, शहरी स्थानिक संस्था या श्रेणीत, पुणे महानगर पालिकेला पुरस्कार मिळाला असून, विविध श्रेणीत मिळून, महाराष्ट्राला पाच पुरस्कार मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेस प्रचारकांची यादी

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनिल तटकरे यांनी, २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यात उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार सुनिल तटकरे, मंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला आणि बालविकास मंत्री, अदिती तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष, रुपाली चाकणकर, खासदार नितीन पाटील, सयाजी शिंदे, आमदार अमोल मिटकरी यांचा समावेश आहे.

परिवर्तन महाशक्ती

परिवर्तन महाशक्तीच्या, विधानसभा निवडणूक सुकाणू समितीच्या, पुणे इथल्या बैठकीत, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे, धनंजय जाधव यांची, समन्वयक तर, सह-समन्वयक म्हणून, प्रहार जनशक्तीचे गौरव जाधव आणि स्वाभिमानी पक्षाचे योगेश पांडे, या तिघांच्या नावाची, अधिकृत निवडणूक समन्वयक म्हणून घोषणा करण्यात आली. या बैठकीला, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे, संभाजीराजे छत्रपती, प्रहार जनशक्तीचे, बच्चू कडू, स्वाभिमानी पक्षाचे, राजू शेट्टी यांच्यासह, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्ष प्रवेश

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि, माजी सामाजिक न्यायमंत्री, राजकुमार बडोले यांनी आज, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत, हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष, खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे उपस्थित होते. तर भाजपाचे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, संदीप नाईक यांनी आज, भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस, शरच्चंद्र पवार पक्षात, प्रवेश केला. वाशी इथं पक्षाच्या निर्धार मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. संदीप नाईक बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक

होते. मात्र, भाजपानं त्यांना उमेदवारी नाकारल्यानं त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केल्याचं सांगितलं जात आहे. तर भाजपचे नेते आणि माजी खासदार, निलेश राणे उद्या, शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात, कुडाळमध्ये होणाऱ्या जाहीर सभेत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा, पक्षप्रवेश होईल अशी माहिती, नितेश राणे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. हे सगळं पक्षीय धोरण असल्याचं सांगून, महायुतीच्या फार्म्युल्यानुसार पक्षप्रवेश करत असल्याचं राणे म्हणाले.

फराळ परदेशी

परदेशातील नातेवाईकांना, दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा म्हणून, नागपूर टपाल विभागानं, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविला असून, फराळाचे पदार्थ दिल्यानंतर, ते नाममात्र मुल्यात पॅकेजिंग करून, माफक दरात परदेशात पाठवण्याची सोय केली आहे. टपाल कार्यालयामध्ये येऊ शकत नाहीत अशा, नागरिकांसाठी घरी येऊन, फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा देखील, विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागपूर शहरातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये, दिवाली फराळ, परदेशात पाठवण्याची सुविधा तसंच, पॅकिंग करण्याची सोयही उपलब्ध आहे. ह्या सेवेचा अधिकाधिक लाभ घेऊन, दिवाळी फराळ आपल्या नातेवाईकांना आणि मित्र मैत्रिणींना पाठवावा. आजपासून दिवाळी पर्यंत, फ्री पिकअपच्या सेवेसाठी, 70200 82268 या क्रमांकावर, सकाळी नऊ ते सायंकाळी सातपर्यंत, संपर्क करण्याचं आवाहन, नागपूर विभागाच्या पोस्टमास्टर जनरल, शोभा मधाळे यांनी केलं आहे.

'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी'

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार आणि, नागपूर मनपाच्या पुढाकारानं यंदा, नागपूरकर, 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' साजरी करणार आहेत. केंद्र शासनाच्या 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमे अंतर्गत, नागपूर मनपाद्वारे, २१ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान, विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. यात नागपूरकर जनतेनं, उत्साहानं सहभागी व्हावं, असं आवाहन, मनपा आयुक्त तथा प्रशासक, डॉ.अभिजीत चौधरी यांनी, पत्रकार परिषदेतून केलं आहे. 'स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी' या मोहिमे अंतर्गत, मनपाच्या दहाही झोनमध्ये, प्रभाग स्तरावर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. टाकाऊ वस्तु जमा करून, त्याचा पुन्हा कसा उपयोग करता येईल, यासाठी देखील नियोजन केल्याचं सांगताना चौधरी म्हणाले

*<u>पर्टिक्युलरली आता जे दिवाळीच्या संदर्भामध्ये आपली घरगुती स्वच्छता आपण सगळेजण करत असतो, ते करत असतानाचे वापरात नाहीये अशी आयटम्स आपण बरेचदा डिस्कार्ड करतो. त्यांना त्यामधले जे आयटम्स रिसायकलेबर आहे, अश्या पद्धतीने जर त्यांनी सेग्रीकेशन करून महानगरपालिकेला जर दिले, तर महापालिकेने असे डीसेंट्रलाइज स्वीकार केंद्र ठेवलेल्या आहे. तिथे आम्हाला अपेक्षित अस आहे कि जुने कपडे किंवा रद्दी रिसायलेबल मटेरियल असणार एखाद मेटलस किंवा फर्निचर आहे किंवा ई-वेस्ट आहे, आम्ही त्याला स्वीकारणार आहो. तिकडे आणि मग पुढे प्रॉपर प्रोसेसिंगसाठी आयदर एजन्सीस आमच्याकडे रेग्युलरली काम करतात त्यांच्याकडे दिल जाणार किंवा वेगवेगळ्या एनजीओ आणि बचतगट आहे की जे याला पुढे रिसायकल करतील.</u>*

या उपक्रमामध्ये, नागरिक, नागरिक समुह, अशासकीय संस्था, स्वयं सहायता समूह, शाळांचे विद्यार्थी, युथ ग्रुप यांना, सहभागी करून घेण्यात येणार असल्याचं, चौधरी यांनी सांगितलं.

<u>आढावा विधानसभा मतदारसंघांचा</u>

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं, 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम, दररोज सायंकाळी सात वाजून १० मिनिटांनी, अस्मिता वाहिनीसह, प्रादेशिक वृत्त विभागाच्या, Youtube वरुन, प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज, ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा, आढावा आपल्याला ऐकता येईल.

<u>बाबा सिद्दीकी</u>

बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात, भांडुप परिसरातून दोन देशी बनावटीच्या बंदुकांसह, दोन जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, प्रथम एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं, ज्याच्याकडून देशी बनावटीचं पिस्तूल मिळालं.

*****